स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे**
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६
दूरध्वनी क्रमांक (०२०) २५६५६२३४, Web : www.ropune.org.in Email : ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्रः तंशिविकापु/आस्था-३(अ)/२०२५/ 1100 दिनांक : २७/०३/२०२५

27 MAR 2025

**परिपत्रक –**

**विषय - दिनांक ३०/०३/२०२५ व ३१/०३/२०२५ रोजी शासकीय कार्यालये पूर्णवेळ सुरू ठेवणेबाबत ...**

संदर्भ– संचालनालयाचे पत्र क्र.DTEM-D12/28/2025-DESK 12, दिनांक १३-०३-२०२५.

सर्व संस्था/कार्यालय प्रमुख यांना वरील परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भाकिंत पत्रान्वये मार्च महिन्याच्या अखेरीस देयकांची आवक सुलभरित्या होण्याच्या अनुषंगाने दि. ३०.०३.२०२५ रविवार (सार्वजनिक सुटटी) तसेच दि. ३१.०३.२०२५ सोमवार (रमजान ईद) या दिवशी सार्वजनिक सुटटी असून सदर दिवशी अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई व कोषागार/उपकोषागार कार्यालय सुरू असून या दिवशी देयके स्विकारणे व पारित करण्यात येणार आहे.

तरी सर्व शासकीय संस्थांनी दिनांक ३०/०३/२०२५ व ३१/०३/२०२५ या सुटटीच्या दिवशी कार्यालये सुरू ठेवण्यात यावीत. तसेच सदर दिवशी अर्थसंकल्पित निधीविषयक कामकाज हाताळणारे सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी कार्यालयात उपस्थित रहावे. सोबत संचालनालयाचे पत्राची प्रत जोडली आहे.

सदर परिपत्रक आपल्या अधिपत्याखालील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून त्यांची स्वाक्षरी घ्यावी.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेसाठी.

महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्र. ०२२-68597412/432/463/478
Email ID – desk12@dtemaharashtra.gov.in
internet:- www.dte.maharashtra.gov.in

**तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य**
3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.1967, मुंबई 400 001

**परिपत्रक**

**File No.: DTEM-D12/28/2025-DESK12** दिनांक :

**संदर्भ : आर्थिक वर्ष 2024-25 मधील मार्च अखेर वितरीत निधी व अनुदान पूर्णत: खर्च करण्यासाठी दिनांक 30 व 31 मार्च 2025 रोजी शासकीय कार्यालये पूर्णवेळ सुरु ठेवण्याबाबत...**
**संदर्भ : वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-2025/प्र.क्र. 04/25/ कोषा प्रशा-5, दि. 07.03.2025.**

वित्त विभागाच्या संदर्भिय परिपत्रकानुसार मार्च महिन्याच्या अखेरीस देयकांची आवक सुलभरित्या होण्याच्या अनुषंगाने दि. 30.03.2025 रविवार, (सार्वजनिक सुट्टी) तसेच दि. 31.03.2025 सोमवार (रमजान ईद) या दिवशी सार्वजनिक सुट्टी असून देखील सदर दिवशी अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई व कोषागार / उपकोषागार कार्यालये सुरु असुन या दिवशी देयके स्विकारणे व पारित करण्यात येणार आहेत.

करिता, आर्थिक वर्ष 2024-25 अखेर शासनाने वितरीत केलेला निधी पूर्णत: खर्च करण्याकरीता दि. 30 व 31 मार्च, 2025 या सुट्टीच्या दिवशी कार्यालये सुरु ठेवण्यात यावीत. सदर दिवशी अर्थसंकल्पित निधीविषयक कामकाज हाताळणारे सर्व अधिकारी व कर्मचारी कामावर उपस्थित राहतील याची दक्षता घेण्यात यावी. शासना मार्फत वितरीत निधी खर्च करण्यासाठी उपलब्ध असताना, सदरचा निधी खर्च न होता शासनास समर्पित झाल्यास संबंधित संस्था / कार्यालय प्रमुखांना व्यक्तीश: जबाबदार धरण्यात येईल याची नोद घ्यावी.

Signed by
Vinod Mahadeorao Mohitkar
Date: 13-03-2025 17:42:24

( डॉ. विनोद मोहितकर )
**संचालक,**
**तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

प्रत :- मा. अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शाासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई 400032 यांना माहितीसाठी सादर.
प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी:-

1. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे / नाशिक / छत्रपती संभाजीनगर / अमरावती / नागपूर, त्यांना कळविण्यात येते की, त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय संस्था / कार्यालय प्रमुखांना सदर दिवशी पूर्णवेळ कार्यालये सुरु ठेवण्याबाबतच्या सूचना त्यांचे स्तरावरुन देण्यात याव्यात.
2. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.
3. प्राचार्य, सर्व शासकीय अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये, शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्था.
4. नियंत्रक अधिकारी / पर्यवेक्षकीय अधिकारी / कार्यासन अधिकारी, सर्व कार्यासने, तंत्रशिक्षण संचालनालय,मुख्य कार्यालय, मुंबई. त्यांना कळविण्यात येते की, कार्यासनातील अर्थसंकल्पिय निधीविषयक कामकाज हाताळणारे सर्व अधिकारी व कर्मचारी दि.30 व 31 मार्च 2025 या दिवशी (बी.डी.एस. प्रणाली सुरु असेपर्यंत) पूर्णवेळ कामावर उपस्थित राहतील याची दक्षता घ्यावी.
5. निवडनस्ती (कार्यासन क्रमांक 12)